## बहुधा

मी, तू, तो वगैरे
कुणीही असू शकतो
वय वर्षे पस्तीस.
हाडकुळा
देहयष्टी किरकोळ
हाडावरून कुपोषणाने
गळू लागलेली
सुरकुतलेली मासाची खोळ.

देव, धर्म, पंथ
माणसांना
शिवाशिव केलेले जंत
आता,
माझी, तुझी, त्याची वगैरे
वाट अडवत नाहीत.

बघ ना जरा
करून
दैनंदिनीची उघडझाप
कळेलच की, मित्रा!
महामारीच्या गर्तेत
आपसुकच
तथाकथित
शतक संपलंय रे बहुदा.

**सत्य प्रयागबाई कुटे**
बुलडाणा
shabdankan58@gmail.com